संगणक संकेतांक २०१२२०१११४३५४४७८२५

RNI No. MAHBIL/2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक ३] शनिवार, एप्रिल २१, २०१२/वैशाख १, शके १९३४ [ पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.**— मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . | पृष्ठे १—६ |

दिनांक २१ एप्रिल २०१२ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २१ एप्रिल २०१२ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१८८८ चा मुंबई ३. १९७५ चा महा. ४४. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यांमध्ये आणखी सुधारणा

करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक १२ मार्च २०१२ रोजी मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अध्यादेश, २०१२ प्रख्यापित केला होता ; २०१२ चा महा. अध्या. ४.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या त्रेसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम, २०१२ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १२ मार्च २०१२ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण दोन

## मुंबई महानगरपालिका अधिनियम याची सुधारणा

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १२८ ची सुधारणा. **२.** मुंबई महानगरपालिका अधिनियम (या प्रकरणात, यापुढे ज्याचा निर्देश " मुंबई महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम १२८ च्या पोट-कलम (३) मध्ये,— १८८८ चा मुंबई ३.

(एक) " सरकारी वर्ष २०१०-२०११ व २०११-२०१२ या दरम्यान, कोणत्याही वेळी, " या मजकुराऐवजी, " सरकारी वर्ष २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-२०१३ या दरम्यान, कोणत्याही वेळी, " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " दोन वर्षे " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह ज्या ज्या ठिकाणी आला असेल त्या त्या ठिकाणी, " तीन वर्षे " असा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह, दाखल करण्यात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४०अ ची सुधारणा. **३.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४०अ मधील,—

(क) पोट-कलम (२) मध्ये, " २०१०-२०११ व २०११-२०१२ " या मजकुराऐवजी " २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-२०१३ " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (२) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(२-अ) पोट-कलमे (१) किंवा (२) मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दिनांक १ एप्रिल २०१० रोजी किंवा त्यानंतर पहिल्यांदाच निर्धारण केले जाण्यास पात्र असलेल्या इमारती व जमिनी यांवरील कर हा, तात्पुरत्या स्वरूपात, जणू काही अशा इमारती व जमिनी या २००९-२०१० वर्षामध्ये निर्धारण केल्या जाण्यास पात्र आहेत असे समजून, बसविलेल्या कराइतका असेल; आणि अशा इमारती व जमिनींचे भांडवली मूल्य निश्चित करण्यात आल्यानंतर, महानगरपालिकेला त्यांच्या भांडवली मूल्याच्या आधारे त्या ज्या वर्षासाठी निर्धारण केल्या जाण्यास पात्र आहेत त्या वर्षाच्या संबंधात एक अंतिम बील बजावता येईल आणि त्यानुसार अशा इमारतींच्या किंवा जमिनींच्या मालकाने अथवा भोगवटादाराने उपरोक्तप्रमाणे बजाविलेल्या बिलामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत असा कर भरणे, हे त्याचे कर्तव्य असेल. ".

४. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४१ मध्ये पोट-कलम (२) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल, आणि ते दिनांक १ एप्रिल १९६७ पासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :— सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४१ ची सुधारणा.

"(२) कलम १६९ च्या तरतुदींच्या अधीनतेने, बृहन्मुंबईत स्थित असलेल्या सर्व परिवास्तुंच्या बाबतीत पाणी लाभ कर बसविण्यात येईल, मात्र भारत सरकारने तशी मान्यता दिलेल्या विदेशी राष्ट्राच्या महा वाणिज्यदूत, वाणिज्यदूत, उप वाणिज्यदूत, वाणिज्यिक अभिकर्ता, प्रति-वाणिज्यदूत अशा नावाने किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधण्यात येणा-या कोणत्याही कॉन्स्यूल द कॅरिअर (Consul de carrier) याच्याकडे, अथवा अशा अधिका-यांच्या कर्मचारी वर्गाच्या (भारतीय नागरिक नसलेल्या) कोणत्याही सदस्यांकडे, निहित असलेल्या किंवा ते भोगवटा करीत असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांना, आणि नफ्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येणा-या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांना यातून वगळण्यात येईल. ".

५. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४२ मध्ये पोट-कलम (४) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल, आणि ते दिनांक १ एप्रिल १९६७ पासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :— सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४२ ची सुधारणा.

" (४) कलम १७० च्या तरतुदींच्या अधीनतेने बृहन्मुंबईत स्थित असलेल्या सर्व परिवास्तुंच्या बाबतीत मलनिस्सारण लाभ कर बसवण्यात येईल, मात्र भारत सरकारने तशी मान्यता दिलेल्या विदेशी राष्ट्राच्या महा वाणिज्यदूत, वाणिज्यदूत, उप वाणिज्यदूत, वाणिज्यिक अभिकर्ता, प्रति-वाणिज्यदूत अशा नावाने किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधण्यात येणा-या कोणत्याही कॉन्स्यूल द कॅरिअर (Consul de carrier) याच्याकडे, अथवा अशा अधिका-यांच्या कर्मचारी वर्गाच्या (भारतीय नागरिक नसलेल्या) कोणत्याही सदस्यांकडे, निहित असलेल्या किंवा ते भोगवटा करीत असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांना, आणि नफ्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येणा-या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांना यातून वगळण्यात येईल. ".

६. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४३ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :— सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४३ ची सुधारणा.

"(क) भारत सरकारने तशी मान्यता दिलेल्या विदेशी राष्ट्राच्या महा वाणिज्यदूत, वाणिज्यदूत, उप वाणिज्यदूत, वाणिज्यिक अभिकर्ता, प्रति-वाणिज्यदूत अशा नावाने किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधण्यात येणा-या कोणत्याही कॉन्स्यूल द कॅरिअर (Consul de carrier) याच्याकडे, अथवा अशा अधिका-यांच्या कर्मचारी वर्गाच्या (भारतीय नागरिक नसलेल्या) कोणत्याही सदस्यांकडे, निहित असलेल्या किंवा ते भोगवटा करीत असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांना, आणि नफ्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येणा-या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांना यातून वगळण्यात येईल. ".

७. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४४ब मध्ये,— सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४४ब ची सुधारणा.

(एक) खंड (अ) मधील " महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून " या मजकुराऐवजी, " महानगरपालिकेकडून, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ई) मध्ये, शेवटी " किंवा " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(तीन) खंड (ई) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (फ) महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी संक्रमण निवासासाठी म्हणजेच संक्रमण शिबिरासाठी बांधकाम किंवा पुनर्बांधकाम केलेल्या इमारती; किंवा

(ग) महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी भाडे तत्त्वावरील गृहनिर्माण योजनेअंतर्गत बांधकाम किंवा पुनर्बांधकाम केलेल्या इमारती : ".

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १५४अ ची सुधारणा.

८. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १५४अ मध्ये,—

(एक) " सरकारी वर्ष २०१०-२०११ आणि २०११-२०१२ यासाठी " या मजकुराऐवजी " सरकारी वर्ष २०१०-२०११ , २०११-२०१२ व २०१२-२०१३ यासाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, ज्या इमारती व जमिनी या १ एप्रिल २०१० रोजी किंवा त्यानंतर पहिल्यांदाच निर्धारित केल्या जाण्यास पात्र असतील अशा इमारती व जमिनींच्या संबंधात या कलमान्वये अंतिम भांडवली मूल्य निश्चित होईपर्यंत, अशा इमारती व जमिनीचे भांडवली मूल्य हे, तात्पुरत्या स्वरुपात महानगरपालिकेने सरकारी वर्ष २००९-२०१० करिता विहित केलेल्या पट्टीयोग्य मूल्याच्या आधारे काढलेल्या करयोग्य मूल्याच्या रक्कमेइतके असेल. ".

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १७२ ची सुधारणा.

९. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १७२ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील, " २०१०-२०११ आणि २०११-२०१२ या वर्षाकरिता " या मजकुराऐवजी " २०१०-२०११, २०११-२०१२ आणि २०१२-२०१३ या वर्षाकरिता " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मधील, परंतुकामध्ये, " २०१०-२०११ आणि २०११-२०१२ या सरकारी वर्षाकरिता दर निश्चित करणारे नियम हे " या मजकुराऐवजी " २०१०-२०११, २०११-२०१२ आणि २०१२-२०१३ या सरकारी वर्षाकरिता दर निश्चित करणारे नियम हे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (३) ज्या इमारती व जमिनी १ एप्रिल २०१० रोजी किंवा त्यानंतर पहिल्यांदाच निर्धारणा केली जाण्यास पात्र असतील अशा इमारतींच्या किंवा जमिनींच्या बाबतीत पाणी कर व आकार आणि मलनिस्सारण कर व आकार हे जणू काही अशा इमारतींचे आणि जमिनींचे निर्धारण हे २००९-२०१०, या वर्षात करण्यात आले आहे असे समजून त्यांच्या पट्टीयोग्य मूल्यांच्या आधारे तात्पुरत्या स्वरुपात बसविण्यात येतील; आणि अशा इमारतींचे व जमिनींचे भांडवली मूल्य निश्चित केल्यावर, महानगरपालिकेस, पट्टीयोग्य मूल्याच्या आधारे ज्या वर्षाची तात्पुरती बिले बजावली असतील अशा वर्षांच्या संबंधातील अंतिम बील त्यांच्या भांडवली मूल्यांच्या आधारे बजावता येईल आणि त्यानुसार पूर्वोक्तप्रमाणे निर्गमित केलेल्या अंतिम बिलात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत असा कर भरणे हे अशा इमारतींच्या व जमिनींच्या मालकाचे आणि भोगवटादाराचे कर्तव्य असेल. ".

१०. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या विवक्षित तरतुदींचा परिणाम अधिभावी असणे बाबत तरतुदी असलेल्या कलम २१९अ ला कलम २१९अब असा नवीन क्रमांक देण्यात येईल; आणि अशाप्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या कलम २१९अब मध्ये, " किंवा यथास्थिति, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, २०११ " या मजकुराऐवजी, " महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, २०११ किंवा, यथास्थिति, मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम, २०१२ " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(समासातील टीप: २०११ चा महा. ११. २०११ चा महा. ११. २०१२ चा महा. ६. — सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २१९अ ची सुधारणा.)

## प्रकरण तीन

## महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ याची सुधारणा

(समासातील टीप: १९७५ चा महा. ४४. — सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम १८ ची सुधारणा.)

**११.** महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ याच्या कलम १८ मध्ये,—

(क) पोट-कलम (१क) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील, आणि ती दिनांक १ एप्रिल १९८८ पासून दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल :—

" (१ख) भारत सरकारने तशी मान्यता दिलेल्या विदेशी राष्ट्राच्या महा वाणिज्यदूत, वाणिज्यदूत, उप वाणिज्यदूत, वाणिज्यिक अभिकर्ता, प्रति-वाणिज्यदूत अशा नावाने किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या कोणत्याही कॉन्स्युल द कॅरिअर (Consul de carrier) यांच्याकडे, अथवा अशा अधिकाऱ्यांच्या कर्मचारी वर्गाच्या (भारतीय नागरिक नसलेल्या) कोणत्याही सदस्यांकडे, निहित असलेल्या किंवा ते भोगवटा करीत असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांना आणि नफ्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांच्या बाबतीत पोट-कलम (१) किंवा (१क) अन्वये कोणताही वृक्ष उपकर बसविण्यायोग्य असणार नाही.

(१ग) ज्या इमारती व जमिनी १ एप्रिल २०१० रोजी किंवा त्यानंतर पहिल्यांदाच निर्धारण केले जाण्यास पात्र असतील अशा इमारतींच्या आणि जमिनींच्या बाबतीत २००९-२०१० या सरकारी वर्षाच्या संबंधात नागरी स्थानिक प्राधिकरणाने विहित भाडे दरांच्या आधारे काढलेल्या पट्टीयोग्य मूल्यानुसार अशा इमारतींचे आणि जमिनींचे निर्धारण केले आहे असे समजून, अशा इमारतींचे आणि जमिनींचे संबद्ध कायद्यान्वये निर्धारण होईपर्यंत, वृक्ष उपकर भरण्यासाठी तात्पुरते बिल बजावणे हे त्या नागरी स्थानिक प्राधिकरणासाठी विधिसंमत असेल. त्याचे भांडवली मूल्य निर्धारित केल्यावर, पोट-कलम (१क) अन्वये अशा उपकराची रक्कम निर्धारित करण्यात येईल आणि त्यानुसार, ज्या वर्षाचे भांडवली मूल्य निर्धारित केले असेल त्या वर्षाच्या संबंधातील अंतिम बिल बजावणे हे त्या प्राधिकरणासाठी विधिसंमत असेल." ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये " पोट-कलम (१) किंवा, यथास्थिति, पोट-कलम (१क)" या मजकुराऐवजी, " पोट-कलम (१), (१क) किंवा, यथास्थिति (१ग) " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## प्रकरण चार

## संकीर्ण

सन २०१२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ याचे निरसन व व्यावृत्ती.

**१२.** (१) मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अध्यादेश, २०१२ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०१२ चा महा. अध्या. ४.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना आणि आदेश यांसह) ही या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल. १८८८ चा मुंबई ३. १९७५ चा महा. ४४.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.